Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक जन सत्याचे प्राईम्स सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नन्नवरे
।रविवार, दि. ७ जून २०२६। वर्ष १ ।अंक ६२ ।पाने २।
DIGITAL EDITION



डॉ. माला यांना 'चॅम्पियन्स ऑफ चेंज' पुरस्कार प्रदान (पान २ वर)

» Selected

### घरगुती सिलेंडरच्या दरात पुन्हा मोठी वाढ

**नवी दिल्ली |** गेल्या काही दिवसांपासून अनेक जीवनावश्यक वस्तूंच्या दरात वाढ होताना दिसत आहे. त्यातच आता महागाईचा सर्वसामान्यांना आणखी एक फटका बसला आहे. घरगुती स्वयंपाकाच्या गॅस (एलपीजी) सिलेंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. हे नवीन दर आज ७ जूनपासून लागू झाले आहेत. या दरवाढीनंतर, दिल्लीत १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलेंडरची किंमत ₹९१३ वरून ₹९४२ होणार आहे. गेल्या तीन महिन्यांतील ही दुसरी दरवाढ आहे. यापूर्वी ७ मार्च रोजी प्रति सिलेंडर ६० रुपयांची दरवाढ झाली होती. त्यानंतर आता पुन्हा दरवाढ केली गेली आहे. पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम झाला आहे, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. मार्चमध्ये ६० रुपयांची दरवाढ होऊनही, तेल विपणन कंपन्यांना घरगुती एलपीजी विक्रीतून तोटा होत होता.

## नीट पेपरफुटीविरोधात दिल्लीच्या जंतरमंतरवर 'कॉक्रोच जनता पार्टी'चे वादळ धडकले

# तरुणाई विकली गेलेली नाही!

### अभिजीत दिपके यांचे प्रतिपादन; शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी सरकारला सात दिवसांचा अल्टिमेटम

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली : केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना सात दिवसांत हटविले नाही तर देशव्यापी आंदोलन केले जाईल, असा इशारा कॉक्रोच जनता पार्टीने (सीजेपी) शनिवारी दिला. आम्ही घाबरणार नाही तसेच आम्हाला कोणी संपवू शकणार नाही, असे आव्हान पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी जंतरमंतर येथील आंदोलनात दिले.**

तुरुंगवासाच्या भीतीने अनेक जण विकले गेले आहेत. मात्र या देशातील तरुण तसेच विद्यार्थी विकलेला नाही असेही त्यांनी निक्षून सांगितले. कॉक्रोच जनता पार्टीचे (सीजेपी) संस्थापक अभिजीत दिपके यांनी शनिवारी नवी दिल्लीतील जंतर मंतर येथे आंदोलन केले. पर्यावरणवादी सोनम वांगचुक, सीजेपीचे प्रवक्ते सौरभ दास यांच्यासह शेकडो तरुण यावेळी उपस्थित होते.

अमेरिकेहून आगमन झाल्यानंतर दिपके यांनी जंतरमंतर येथे आंदोलन केले. विद्यार्थी, स्पर्धा परीक्षार्थी यांच्यासह शेकडो तरुण जंतरमंतर येथे उपस्थित होते. "आमचा संघर्ष दीर्घकाळ चालणार आहे. समाजमाध्यमाद्वारे शिक्षणमंत्री



धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा आपण मागितला. मात्र सरकार संबंधितांवर करण्याऐवजी आमची समाजमाध्यम खाती बंद करणे किंवा मजकुरावरावर निर्बंध आणणे अशाच उद्योगात गुंतल्याचा आरोप दिपके यांनी केला. समाजमाध्यमावरील आमचा मजकूर वगळाल, पण आम्हाला संपवू शकणार नाही, असे दिपके यांनी स्पष्ट केले.

दिपके यांच्या आंदोलनाला दिल्ली पोलिसांनी परवानगी दिली होती. यावेळी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करणारे फलक आणि पक्षाचे मुखवटे परिधान करून युवक आंदोलनस्थळी येत होते. नीट, सीबीएसई, सीयूईटी परीक्षा आणि भरती चाचण्यांमधील कथित अनियमिततेबद्दल जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करणार्या 'सीजेपी' या तरुणांच्या नेतृत्वाखालील ऑनलाइन चळवळीने हे आंदोलन आयोजित केले होते. दिपके यांनी आंदोलकांना देशाचा जयजयकार करण्याच्या घोषणा द्याव्यात, अशी सूचना केली. महात्मा गांधी तसेच बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीय राजकारणाला विरोध केल्याचे नमूद केले. सहा जण ताब्यात : आंदोलनस्थळी दोन गटांमधील वाद टाळण्यासाठी पोलिसांनी सहा जणांना ताब्यात घेतले. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी ही कारवाई केल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

#### सोशल मीडिया पोस्ट हटवू शकते, आम्हला नाही

सरकार सोशल मीडिया पोस्ट हटवू शकते, आम्हाला नाही, असा थेट इशारा अभिजित दिपके यांनी दिला आहे. मायदेशात आल्यावर अटक होईल अशी धास्ती माझ्या आईला होती. ही केवळ माझ्याच नव्हे तर, राजकारणावर भाष्य करणार्या बहुसंख्य युवकांच्या आईची धारणा असल्याचे दिपके यांनी सांगितले. आंदोलनस्थळी कडेकोट सुरक्षा होती. पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक हेदेखील आंदोलनात सहभागी झाले होते. दुपारी साडेतीन वाजता आंदोलन समाप्त झाले.

#### उद्धव ठाकरे यांचा आंदोलनाला पाठिंबा

दिल्लीच्या जंतरमंतरवर कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पाठिंबा दर्शविला आहे. रणरणत्या उन्हात भविष्याची चिंता घेऊन रस्त्यावर उतरणाऱ्या तरुण पिढीला कॉक्रोच म्हणून हिणवणे व न्याय नाकारणे योग्य नाही. ही तरुण पिढी कॉक्रोच बनून आक्रोश करीत असून त्यांना कमी लेखू नका, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## दोन कोटींचा औषध व वैद्यकीय साठा जप्त


### एफडीएची राज्यभरात धडक कारवाई

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार राज्यभर राबविण्यात आलेल्या विशेष तपासणी मोहिमेत मुंबई, भिवंडी आणि पालघर जिल्ह्यातील तीन आस्थापनांवर धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण सुमारे २ कोटी रुपयांहून अधिक किमतीचा औषध व वैद्यकीय साहित्याचा साठा जप्त अथवा प्रतिबंधित करण्यात आला असून औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० तसेच वैद्यकीय उपकरण नियम २०१७ चे गंभीर उल्लंघन करणाऱ्या संबंधित कंपन्यांविरोधात कारवाई सुरू करण्यात आली आहे.

एफडीएच्या तपास पथकाने साकीनाका येथील 'मे. साची मेडिक' या आस्थापनावर छापा टाकला असता संबंधित व्यावसायिकाने कोणताही वैध परवाना किंवा नोंदणी नसताना मलेशियातून विना निर्जंतुकीकरण (NON-STERILE) सर्जिकल ग्लोव्हज आयात करून त्यांची बेकायदेशीर साठवणूक व विक्री केल्याचे उघड झाले. तपासादरम्यान हे ग्लोव्हज भिवंडी आणि वाडा येथील परवानाधारक उत्पादकांकडे पॅकिंग व लेबलिंगसाठी पाठवून पुढे बाजारात विक्रीसाठी पुरवले जात असल्याचेही समोर आले. या कारवाईत सुमारे ७४.८५ लाख रुपयांचे विना निर्जंतुकीकरण सर्जिकल ग्लोव्हज जप्त करण्यात आले.



#### चौकशी अहवालानंतर स्पष्ट होणार वस्तुस्थिती

प्राथमिक चौकशीत या साहित्याचा पुरवठा मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांनाही करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. यानंतर भिवंडी येथील संबंधित वैद्यकीय उपकरण उत्पादन केंद्राची तपासणी करण्यात आली. तेथे वैद्यकीय उपकरण नियम २०१७ च्या अनेक तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्याने प्रशासनाने ९.८८ लाख रुपयांचा ग्लोव्हज साठा प्रतिबंधित केला असून कारणे दाखवा नोटीस बजावत उत्पादन बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

## फुलगाव सरपंचावरील अविश्वास ठराव बारगळला; शाम फुलगावकर यांच्या बाजूने दिला कौल

### विशेष ग्रामसभेत दहोक्याचा निकाल; दीड हजारांहून अधिक ग्रामस्थांचा सहभाग, समर्थकांकडून जल्लोष

**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ | प्रतिनिधी:** भुसावळ तालुक्यातील फुलगाव ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच शाम फुलगावकर यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेला अविश्वास ठराव अखेर बारगळला असून विशेष ग्रामसभेत ग्रामस्थांनी मोठ्या बहुमताने त्यांच्या बाजूने कौल दिला आहे. या निकालामुळे शाम फुलगावकर यांचा सरपंचपदावरील विश्वास कायम राहिला असून गावातील राजकीय घडामोडींना नवे वळण मिळाले आहे. फुलगाव ग्रामपंचायतीतील काही सदस्यांनी सरपंचांविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता. संबंधित प्रस्तावावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली आवश्यक प्रक्रिया पार पडली आणि त्यानंतर अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे



पाठविण्यात आला. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ५ जून रोजी फुलगाव येथे विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. ग्रामसभेत सरपंचांवरील विश्वासाबाबत मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी तसेच महसूल विभागातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. मतदानासाठी ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत लोकशाही प्रक्रियेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. झालेल्या मतदानात सरपंच शाम फुलगावकर यांना विरोधकांच्या तुलनेत तब्बल ४८ मतांची आघाडी मिळाली. त्यामुळे ग्रामस्थांनी त्यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास व्यक्त करत त्यांना सरपंचपदी कायम ठेवण्याचा निर्णय दिला. या विशेष ग्रामसभेत दीड हजारांहून अधिक ग्रामस्थांनी सहभाग नोंदविल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, फुलगाव ग्रामपंचायतीत भाजपचे आठ सदस्य असून त्यांच्या वतीने अविश्वास प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. दुसरीकडे, सरपंच शाम फुलगावकर हे सध्या शिवसेनेशी संबंधित असल्याने या निकालाकडे तालुक्यातील राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले होते. निकाल जाहीर होताच फुलगावमध्ये समर्थकांनी जल्लोष साजरा करत मिरवणूक काढली. फटाक्यांची आतषबाजी आणि घोषणाबाजी करत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.


## यंदाही शाळांमध्ये त्रिभाषा सूत्र लागू होणार नाही!

### १५ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्ष सध्याच्या धोरणानुसारच सुरू होणार

**जन सम्राट टाईम्स**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनईपी) आधारे राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा सूत्र यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून लागू होण्याची शक्यता तूर्तास मावळली आहे. १५ जूनपासून सुरू होणारे नवीन शैक्षणिक वर्ष सध्याच्या शैक्षणिक धोरणानुसारच चालणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत असून, राज्य सरकारने अद्याप याबाबत कोणताही अंतिम निर्णय घेतलेला नाही.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात त्रिभाषा सूत्राचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार राज्यात नवीन भाषा धोरण लागू करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वी केली होती. गेल्या वर्षी इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीची करण्याचा शासन





निर्णयही जारी करण्यात आला होता. मात्र, या निर्णयाला विविध राजकीय पक्ष, शैक्षणिक संघटना आणि पालकांकडून तीव्र विरोध झाल्याने सरकारला माघार घ्यावी लागली.

यानंतर सुधारित आदेश काढून तिसरी भाषा म्हणून कोणतीही भारतीय भाषा निवडण्याची मुभा देण्यात आली. तरीही हा निर्णय हिंदी सक्तीचा अप्रत्यक्ष प्रयत्न असल्याचा आरोप करत शिवसेना आणि मनसेसह विविध संघटनांनी आंदोलन छेडले होते. वाढत्या वादाच्या पार्श्वभूमीवर सरकारने त्रिभाषा धोरणाच्या अंमलबजावणीचा आदेश रद्द केला.

या विषयाचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी शिक्षणतज्ज्ञ आणि अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आठ सदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली होती. समितीने राज्यभर जनसंवाद, शिक्षक-पालक बैठका, तज्ज्ञांशी चर्चा आणि ऑनलाइन माध्यमातून नागरिकांच्या सूचना मागवून व्यापक अभ्यास केला. त्यानंतर फेब्रुवारी महिन्यात समितीने आपला अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर केला.

मात्र, सूत्रांच्या माहितीनुसार गेल्या काही महिन्यांपासून हा अहवाल शिक्षण विभागात प्रलंबित असून त्यावर अद्याप कोणतीही राजकीय किंवा प्रशासकीय पातळीवरील कार्यवाही झालेली नाही. अहवालातील शिफारशी संवेदनशील स्वरूपाच्या असल्याने त्यावर मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ स्तरावर चर्चा होणे आवश्यक असल्याचे सांगितले जात आहे. याबाबत शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी स्पष्ट केले आहे की, त्रिभाषा धोरणासंदर्भातील नरेंद्र जाधव समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला असून त्यावर मुख्यमंत्र्यांचे मार्गदर्शन घेतल्यानंतर मंत्रिमंडळात चर्चा करून अंतिम निर्णय घेतला जाईल. मात्र, नवीन शैक्षणिक वर्ष अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने यंदाचे शैक्षणिक वर्ष सध्याच्या धोरणाप्रमाणेच सुरू राहणार आहे. त्यामुळे राज्यातील विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये सुरू असलेला त्रिभाषा सूत्राबाबतचा संभ्रम काही प्रमाणात दूर झाला असला, तरी भविष्यात सरकार कोणती भूमिका घेते याकडे शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## महिलांना अश्लील हावभाव करणाऱ्याविरोधात एल्गार!

### सहा तास पोलिस ठाण्यात प्रतीक्षा

**जन सम्राट टाईम्स**

**धुळे | प्रतिनिधी :** धुळे शहरातील मोगलाई परिसरात महिलांकडे पाहून वारंवार अश्लील हावभाव करून छेडछाड करणाऱ्या एका विकृत व्यक्तीविरोधात अखेर संतप्त महिलांनी एकजूट दाखवत कायदेशीर लढा उभारला. शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी महिलांना तब्बल सहा तास ताटकळत राहावे लागले. अखेर जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या हस्तक्षेपानंतर संबंधिताविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. या संपूर्ण प्रकारामुळे धुळ्यात महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मोगलाई भागातील फुलेनगर परिसरात राहणारा संतोष दामोदर हा गेल्या अनेक दिवसांपासून परिसरातील महिलांकडे पाहून अश्लील हावभाव करत असल्याचा आरोप स्थानिक महिलांनी केला आहे. वारंवार घडणाऱ्या या प्रकारामुळे महिला आणि नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. या विकृत कृत्याला पुरावा मिळावा यासाठी परिसरातील एका महिलेने संबंधित व्यक्तीचे अश्लील हावभाव मोबाईलमध्ये चित्रीत केले. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर महिलांनी आणि स्थानिक नागरिकांनी एकत्र येत संबंधिताविरोधात कठोर कारवाईची मागणी केली आणि थेट शहर पोलीस ठाणे गाठले. मात्र, तक्रार नोंदविण्यासाठी आलेल्या महिलांची सुरुवातीला दखल घेतली जात नसल्याचा आरोप उपस्थित महिलांनी केला. तक्रार दाखल करण्यात होत असलेल्या कथित टाळाटाळीमुळे संतप्त महिलांनी आणि नागरिकांनी थेट जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेतली. त्यांनी संबंधित व्हिडिओची





पाहणी केल्यानंतर तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. पोलीस अधीक्षकांच्या स्पष्ट निर्देशानंतर अखेर सुमारे सहा तासांच्या प्रतीक्षेनंतर संतोष दामोदर याच्याविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. या घडामोडीदरम्यान पोलीस ठाण्याबाहेर मोठ्या संख्येने महिला, पुरुष आणि युवक उपस्थित होते.

#### आरोपीविरोधात कारवाई व्हावी

स्थानिक महिलांनी सांगितले की, परिसरात अशा प्रकारच्या घटना सातत्याने घडत असल्याने अनेक महिला मानसिक त्रास सहन करत होत्या. मात्र यापुढे अशा प्रकारांना मूकपणे सहन न करता एकत्र येऊन कायदेशीर मार्गाने लढा देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. या घटनेमुळे महिला सुरक्षेबाबत पोलीस यंत्रणेची संवेदनशीलता, तक्रारींवर तातडीने होणारी कार्यवाही आणि सार्वजनिक ठिकाणी महिलांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. दरम्यान, तपास सुरू असून संबंधित आरोपीविरोधात कायद्यानुसार कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि महिला संघटनांकडून करण्यात येत आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## दीड लाखांचे मासिक वेतन, तरीही 6.40 लाखांची लाच घेताना तहसीलदार जाळ्यात!

### अवैध वाळू वाहतुकीसाठी तब्बल १२ लाखांची मागणी; अंबडच्या तहसीलदाराला एसीबीची बेडी, शहागडमध्ये वाळू माफियांचा जल्लोष

**जन सम्राट टाईम्स**

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी :** महसूल विभागातील भ्रष्टाचाराचे धक्कादायक वास्तव उघड करणाऱ्या कारवाईत बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अंबड येथील तहसीलदार विजय लक्ष्मण चव्हाण (वय ४७) यांना ६ लाख ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात अटक केली आहे. अवैध वाळू उपसा आणि वाहतूक निर्धोकपणे सुरू ठेवण्यासाठी त्यांनी तब्बल १२ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप असून, या कारवाईमुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी तहसीलदार विजय चव्हाण हे छत्रपती संभाजीनगर येथील सातारा परिसरातील कासलीवाल मार्वल येथे वास्तव्यास आहेत. शासनाकडून दरमहा सुमारे दीड लाख रुपये वेतन मिळत असतानाही त्यांनी अवैध वाळू व्यवसायाला संरक्षण देण्यासाठी मोठ्या रकमेची लाच मागितल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

एसीबीच्या माहितीनुसार, अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीवर कोणतीही कारवाई न करण्याच्या बदल्यात चव्हाण यांनी १२ लाख रुपयांची मागणी केली होती. त्यापैकी ६ लाख ४० हजार रुपयांचा पहिला हप्ता स्वीकारताना शनिवारी (६ जून) सुटीच्या दिवशी स्वतःच्या घराबाहेरच एसीबीच्या पथकाने सापळा रचून त्यांना ताब्यात घेतले.



विशेष म्हणजे, शासनाकडून घसघशीत वेतन मिळूनही आरोपी तहसीलदार वाळू माफियांकडून दररोज सुमारे दीड लाख रुपये उकळत असल्याची माहितीही समोर आली आहे. त्यामुळे महसूल यंत्रणेत भ्रष्टाचार किती खोलवर रुजला आहे, याची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

या प्रकरणी सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून बीड एसीबीचे पोलीस उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई पार पडली. या धडक कारवाईमुळे महसूल विभागातील भ्रष्ट अधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. दरम्यान, अंबडमधील कारवाईची बातमी समोर येताच शहागड परिसरात काही वाळू व्यावसायिकांनी फटाके फोडून जल्लोष केल्याची चर्चा रंगली आहे. या प्रकरणाच्या सखोल तपासातून आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

#### अंगझडतीत अपलचे घड्याळ, सोन्याच्या अंगठ्या जप्त

चव्हाण याला ताब्यात घेतल्यानंतर केलेल्या अंगझडतीत त्याच्याकडे एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल, ॲपल कंपनीचे घड्याळ (स्मार्टवॉच), पिवळया धातूच्या दोन अंगठ्या, एक पेंडल लॉकेट आणि ६ हजार ३७० रुपयांची रोख रक्कम आढळून आली आहे. सध्या त्यांच्या घराची झडती घेण्याची प्रक्रिया सुरू असून, या प्रकरणी सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही धडक कारवाई बीड एसीबीचे पोलीस उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले यांच्या पथकाने केली.

#### बीडमध्ये पोलीस अमलदाराला लाच घेताना अटक

पोलीस अमलदाराने तक्रारदाराकडे अपघातामध्ये मृत झालेल्या वडिलांचे विम्याच्या दाव्यासाठी कागदपत्र देण्यासाठी 15 हजारांची लाच मागणी केली. या प्रकरणात दहा हजार रुपये स्वीकारताना पोलीस अमलदाराला रंगेहाथ पकडलं. दत्तात्रय बळवंत असे अटक केलेल्या पोलीस अमलदाराचे नाव आहे. पोलीस अमलदाराला जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडलं. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईने खळबळ उडाली असून बीडमध्ये लाचखोरीच्या घटना थांबणार कधी असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# कार्यकर्ता हाच माझा श्वास, जनतेचे प्रेम हीच माझी खरी संपत्ती : मंत्री गुलाबराव पाटील

## "गुलाबराव पाटील हे खानदेशाच्या जनतेच्या हृदयात घर केलेले लोकनेते : खा.डॉ. श्रीकांत शिंदे

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** जनतेचे प्रेम, कार्यकर्त्यांचा विश्वास आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांची शिदोरी याच बळावर आपण राजकारणाची वाटचाल करत असल्याची भावनिक साक्ष देत राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यात जनतेशी मनमोकळा संवाद साधला. "मी कोणत्याही सत्तेच्या किंवा पदाच्या भरोशावर नाही, तर माझ्यासमोर बसलेल्या जनतेच्या आणि कार्यकर्त्यांच्या आशीर्वादावर राजकारण करतो. कार्यकर्ता हा माझा जीव की प्राण आहे. कार्यकर्ते हेच माझे खरे कुटुंब आहे," असे भावनिक प्रतिपादन त्यांनी केले. समोर उपस्थित असलेली जनसमुदायाची गर्दी हीच आपल्या आयुष्याची खरी कमाई असल्याचे सांगताना त्यांनी शेवटच्या घटकातील सामान्य जनतेची सेवा हेच आपल्या आयुष्याचे ध्येय राहिल्याचे नमूद केले. "देवा, मला कितीही मोठं कर; पण मला आणि माझ्या कुटुंबाला कधी गर्व येऊ देऊ नकोस," अशी प्रार्थना व्यक्त करत त्यांनी एका सर्वसामान्य पानटपरी चालकाला "गुलाब" पासून "गुलाबराव" बनविण्याचे श्रेय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना दिले. शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य माणसाशी असलेली आपली नाळ अधोरेखित करताना त्यांनी सलग सात वर्षे जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री राहण्याचा मान हा जनतेच्या प्रेमाचा आणि आशीर्वादाचा परिणाम असल्याचे सांगितले. विकास, सेवा आणि शिवसेनेच्या विचारांसाठी अखंड झटत राहण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

**"गुलाबराव पाटील हे खानदेशाच्या जनतेच्या हृदयात घर केलेले लोकनेते!" – डॉ. श्रीकांत शिंदे**

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलताना शिवसेना नेते तथा संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी गुलाबराव पाटील यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. "गुलाबराव पाटील हे केवळ मंत्री नसून खानदेशाच्या जनतेच्या हृदयात घर केलेले लोकनेते आहेत.
ते शिवसेनेचा ढाण्या वाघ, धडाडणारी तोफ आणि बाळासाहेबांच्या विचारांवर निष्ठा ठेवणारे खरे शिवसैनिक आहेत," असे गौरवोद्गार त्यांनी काढले. शिवसेना उभी करण्याच्या संघर्षमय काळात सायकल, बैलगाडी आणि पायपीट करून गावोगावी शिवसैनिक जोडणाऱ्या पिढीतील ते एक प्रमुख नेते असल्याचे सांगताना त्यांनी गुलाबराव पाटील यांच्या लोकप्रिय वक्तृत्वाचाही




विशेष उल्लेख केला. एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयाच्या वेळी गुलाबराव पाटील यांच्यासारखे नेते खंबीरपणे सोबत उभे राहिल्यामुळेच महाराष्ट्रात एका सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीला मुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचण्याचा इतिहास घडल्याचे त्यांनी नमूद केले. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री म्हणून जलजीवन मिशनच्या माध्यमातून राज्याच्या कानाकोपऱ्यात पाणी पोहोचविण्याचे उल्लेखनीय कार्य त्यांनी केले असून म्हणूनच त्यांना "पाणीवाले बाबा" ही प्रेमाची उपाधी मिळाल्याचे डॉ. शिंदे म्हणाले. एवढ्या मोठ्या पदावर असूनही आजही ते एका सामान्य कार्यकर्त्यासारखे लोकांमध्ये वावरतात, कार्यकर्त्यांचे सुख-दुःख आपले मानतात आणि म्हणूनच जनतेचे त्यांच्यावर असलेले प्रेम दिवसेंदिवस वाढत असल्याचे सांगत त्यांनी गुलाबराव पाटील यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

**गुलाबराव पाटील हे जळगाव जिल्ह्याच्या विकासाचे शिल्पकार" – आ. चंद्रकांत (अण्णा) सोनवणे**

गुलाबराव पाटील हे केवळ पालकमंत्री नसून शिवसैनिकांच्या मनातील हक्काचे नेतृत्व असल्याचे प्रतिपादन आमदार चंद्रकांत सोनवणे यांनी केले.
पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री म्हणून त्यांनी महाराष्ट्रातील शेवटच्या गावापर्यंत पिण्याचे पाणी पोहोचविण्याचे उल्लेखनीय कार्य केले असून जळगाव जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनी विक्रमी निधी उपलब्ध करून दिल्याचे ते म्हणाले. आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि सिंचन क्षेत्रात त्यांनी केलेल्या कामांमुळे सर्वसामान्य माणसाला दिलासा मिळाला आहे. मंत्रीपद असूनही त्यांच्यात कोणताही अहंकार नसून कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे ते लोकनेते असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

**"तळागाळातील शिवसैनिक ते राज्याचे प्रभावी मंत्री हा प्रेरणादायी प्रवास" – आमदार किशोर पाटील**

गुलाबराव पाटील यांनी गेल्या चार दशकांत तळागाळातील शिवसैनिक म्हणून संघर्ष करत शिवसेना जिल्ह्यात रुजवली आणि आज राज्याच्या राजकारणात प्रभावी स्थान निर्माण केले.असून शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीत त्यांचे योगदान मोलाचे असून कार्यकर्त्यांना न्याय देणारे, विकासाला गती देणारे आणि सर्वांना सोबत घेऊन चालणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण केली असून जलजीवन मिशनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचविण्याचे तसेच जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी ऐतिहासिक कार्य त्यांच्या नेतृत्वाखाली झाले असल्याचे आमदार किशोर पाटील यांनी सांगितले. यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या

### ठळक वैशिष्ट्ये

युवा नेते तथा मा. जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली दिवसभरांच्या कार्यक्रमाचे तसेच सभेचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले होते भगवामय झाला पाळधीचा परिसर सभास्थळ परिसर पूर्णपणे भगवामय झाला होता. सर्वत्र भगवे झेंडे, आकर्षक बॅनर्स, घोषणांचा गजर आणि शिवसैनिकांचा उत्साह पाहून दसरा मेळाव्याची आठवण होत होती. लोकशाहीर सखाराम जोशी प्रतिष्ठानचे शाहीर संग्राम जोशी, संदीप जोशी व त्यांच्या टीमने गुलाबभाऊ अभिष्टचिंतन दमदार पोवाड्यांनी उपस्थितांच्या अंगावर शहारे आणले. ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि गगनभेदी घोषणांनी वातावरण दणाणून गेले.

### सभेला यांची होती उपस्थिती

या जाहीर सभेला खासदार मिलिंद देवरा,आमदार प्रा.चंद्रकांत सोनवणे, आमदार किशोर आप्पा पाटील, आमदार मंजुळा गावीत, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे, रावसाहेब पाटील, माजी खासदार उन्मेश पाटील , शोभाताई चौधरी, उपजिल्हाप्रमुख रवी कापडणे, अनिल भोळे, पी. एम. पाटील, महानगरप्रमुख संतोष पाटील, युवासेना जिल्हाध्यक्ष रोहित कोपटा, भाजपचे ज्येष्ठ नेते सुभाष अण्णा पाटील, ज्ञानेश्वर महाजन, श्याम कोगटा, संजय महाजन, जि.प. सदस्य प्रतापराव पाटील, पवन सोनवणे, गोपाल चौधरी, पाळधीचे सरपंच विजय पाटील, शरद कोळी, माजी सभापती मुकुंदराव नन्नवरे, राजेंद्र चव्हाण, डॉ. कमलाकर पाटील, प्रेमराज पाटील, रमेश आप्पा पाटील, सचिन पवार, भानुदास विसावे, भुसावळ प्र. नगराध्यक्ष शैलजा नारखेडे, यांच्यासह जिल्हाभरातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर, व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदित्य जोशी यांनी केले तर आभार युवा नेते तथा जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांनी मानले.

---

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

## डॉ. माला यांना 'चॅम्पियन्स ऑफ चेंज' पुरस्कार प्रदान

### उल्लेखनीय योगदानाचा राष्ट्रीय गौरव

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । प्रतिनिधी :** समाजपरिवर्तनासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दूरदर्शी नेते, परिवर्तनकर्ते आणि लोकसेवकांचा गौरव करणाऱ्या लायन्स क्लब्स इंटरनॅशनल आणि लायन्स कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित 'चॅम्पियन्स ऑफ चेंज' पुरस्कार सोहळ्याचे आयोजन १ जून २०२६ रोजी चेन्नई येथील आयटीसी ग्रँड चोला येथे उत्साहात पार पडले. या भव्य सोहळ्यात सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. भानुबेन महेंद्र नानावटी होम सायन्स (सक्षम स्वायत्त) महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रो. डॉ. माला पांडुरंग यांना महिलांच्या सक्षमीकरणासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल 'चॅम्पियन्स ऑफ चेंज' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रो. डॉ. माला पांडुरंग यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली डॉ. बीएमएन होम सायन्स (सक्षम स्वायत्त) महाविद्यालयाने



महिला शिक्षण, संशोधन, नवोपक्रम, कौशल्यविकास आणि विद्यार्थिनींच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

### त्यांनी केलेल्या कार्याची दखल

त्यांच्या मार्गदर्शनामुळे हे महाविद्यालय मुंबईतील महिलांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या अग्रगण्य संस्थांपैकी एक म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरले आहे. महिलांना सक्षम, स्वावलंबी आणि समाजाभिमुख नागरिक म्हणून घडविण्याच्या उद्देशाने त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत हा प्रतिष्ठेचा सन्मान प्रदान करण्यात आला.

---

## 'शिव संवाद यात्रा'निमित्त धुळ्यात खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे जल्लोषात स्वागत!

### संघटनात्मक कार्याचे खासदारांकडून कौतुक

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** शिवसेनेचे मुख्य नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या 'शिव संवाद यात्रा'निमित्त धुळे दौऱ्यावर आलेले शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांचे शहरात उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शिवसेना जिल्हाध्यक्ष मनोज मोरे आणि युवासेना धुळे जिल्हाध्यक्ष योगेश मराठे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित स्वागत सोहळ्यात युवासैनिकांनी मोठ्या जल्लोषात सहभाग घेतला. स्वागत समारंभादरम्यान युवासेना जिल्हाध्यक्ष योगेश मराठे यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आकर्षक फ्रेम भेट म्हणून प्रदान केली.

या अनोख्या भेटीबद्दल समाधान व्यक्त करत खासदारांनी योगेश मराठे यांच्या कल्पकतेचे आणि जिव्हाळ्याच्या भावनेचे विशेष कौतुक केले. यावेळी धुळे जिल्ह्यातील युवासेनेच्या संघटनात्मक कार्याचा आणि कार्यकर्त्यांच्या शिस्तबद्ध सहभागाचाही खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी गौरव केला. 'युवासेना धुळे' या संघटनेने जिल्ह्यात उभारलेले काम आणि युवकांचा उत्साह प्रेरणादायी असल्याचे सांगत त्यांनी उपस्थित पदाधिकारी आणि युवासैनिकांचे तोंडभरून अभिनंदन केले.

धुळे जिल्ह्यात युवासेना ज्या ताकदीने आणि समर्पित भावनेने कार्यरत आहे, ते पक्षाच्या बळकटीसाठी महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त करत त्यांनी कार्यकर्त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. त्यांच्या या गौरवोद्गारांमुळे उपस्थित युवासैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या स्वागत सोहळ्यास युवासेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी, शिवसैनिक आणि मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते. 'शिव संवाद यात्रा'च्या निमित्ताने झालेल्या या कार्यक्रमामुळे धुळे जिल्ह्यातील शिवसेना आणि युवासेना कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून आगामी संघटनात्मक उपक्रमांसाठी नवी ऊर्जा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.




### युवासैनिकांचे तोंडभरून अभिनंदन

या अनोख्या भेटीबद्दल समाधान व्यक्त करत खासदारांनी योगेश मराठे यांच्या कल्पकतेचे आणि जिव्हाळ्याच्या भावनेचे विशेष कौतुक केले. यावेळी धुळे जिल्ह्यातील युवासेनेच्या संघटनात्मक कार्याचा आणि कार्यकर्त्यांच्या शिस्तबद्ध सहभागाचाही खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी गौरव केला. 'युवासेना धुळे' या संघटनेने जिल्ह्यात उभारलेले काम आणि युवकांचा उत्साह प्रेरणादायी असल्याचे सांगत त्यांनी उपस्थित पदाधिकारी आणि युवासैनिकांचे तोंडभरून अभिनंदन केले.

---

## शिवराज्याभिषेक दिनानिमित्त धरणगावात विचारजागृतीचा उपक्रम

### 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाच्या १०० प्रतींचे मोफत वितरण

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव । प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या ३५१ व्या वर्धापनदिनानिमित्त धरणगाव शहरात संविधान जागर अभियान आणि सत्यशोधक समाज संघ यांच्या संयुक्त विद्यमाने विचारप्रबोधनाचा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता?' या चर्चित पुस्तकाच्या १०० प्रतींचे नागरिकांना मोफत वितरण करून शिवरायांच्या लोककल्याणकारी विचारांचा जागर करण्यात आला. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित कार्यक्रमाची सुरुवात शिवव्याख्याते लक्ष्मणराव पाटील यांच्या प्रास्ताविकाने झाली. उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर शिवरायांच्या लोकाभिमुख राज्यकारभार, सामाजिक समता आणि धर्मनिरपेक्षतेच्या विचारांचा प्रसार करण्याचा संदेश देण्यात आला. संविधान जागर अभियानाचे कार्यकर्ते सुनील सोनार यांच्या पुढाकारातून 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकासह विविध महापुरुषांच्या



जीवनकार्यावरील माहितीपर पत्रकांचेही वितरण करण्यात आले. युवक-युवतींसह नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. यावेळी बोलताना सत्यशोधक समाज संघाचे जिल्हाध्यक्ष पी. डी. पाटील यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून आजच्या समाजासाठीही ते तितकेच प्रेरणादायी आहे. शिवरायांचा खरा इतिहास आणि सामाजिक न्यायाची भूमिका समजून घेण्यासाठी प्रत्येकाने अशा साहित्याचे वाचन करणे आवश्यक असून कुटुंब आणि समाजात सामुदायिक वाचनाची चळवळ उभी राहण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. सुनील सोनार यांनी आपल्या मनोगतात शिवराज्याभिषेक दिन हा केवळ उत्सव नसून स्वराज्य, समता, न्याय आणि लोकहितकारी शासनव्यवस्थेच्या मूल्यांचे स्मरण करण्याचा दिवस असल्याचे सांगितले. युवकांमध्ये वाचन संस्कृती रुजविणे, इतिहासाकडे चिकित्सक दृष्टीकोनातून पाहण्याची प्रेरणा देणे आणि संविधानिक मूल्यांचा प्रसार करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाला माळी समाजाचे अध्यक्ष व्ही. टी. माळी, काँग्रेस नेते महेश पवार, माजी नगरसेवक किरण मराठे, सलीम बेलदार, राजेंद्र बिऱ्हाडे, नंदू धनगर, लक्ष्मणराव पाटील, आरटीआयचे जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार संघाचे अध्यक्ष आबासाहेब राजेंद्र वाघ, प्रा. आकाश बिवाल, सुरज वाघरे, हेमंत माळी, महेंद्र तायडे, संतोष सोनवणे, मयुर भामरे, सागर महाले, नामदेव मराठे, समाधान महाजन, रवी महाजन, गजानन मराठे, वाल्मिक पाटील, भैय्या धनगर यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज | ज

## सकल मराठा समाजातर्फे धुळ्यात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

### शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिषेक व पुष्पहार अर्पण; विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी:** सकल मराठा समाज, धुळे यांच्या वतीने शनिवारी (दि. ६ जून) छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. यानिमित्त धुळे शहरातील मनोहर चित्र मंदिराजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिषेक करण्यात आला तसेच पुष्पहार अर्पण करून सामूहिक अभिवादन करण्यात आले.
कार्यक्रमादरम्यान "छत्रपती शिवाजी महाराज की जय", "जय



जिजाऊ, जय शिवराय" अशा जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला. उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा जागर करून त्यांच्या आदर्शांचे स्मरण केले. यावेळी बोलताना सुधाकर दादा बेंद्रे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे आजच्या काळात महत्त्व अधोरेखित केले.
"समाजाने संघटित राहून एकजुटीने कार्य करणे ही काळाची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे काम केले. त्यांच्या आदर्शांचा वारसा पुढे नेत गोरगरीब, वंचित आणि दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा," असे आवाहन त्यांनी केले.या कार्यक्रमास सकल मराठा समाजाचे भानुदास बगदे, विनोद जगताप, राजेंद्र काळे, निंबा मराठे, संजय शेंडे, उल्हास यादव, मनोज ढवळे, विकास बाबर, अतुल सोनवणे, किशोर वाघ, श्रीराम जाधव, सुनिल वरपे, सुनील पाटील, भैया शिंदे, पप्पू माने, दिपक रौधळ, अशोक बाबर, सुनिल ठाणगे, श्याम निरगुडे, उल्हास पाटील, राकेश भोसले, बापू कदम, संभा पाटील, विकी पाटील, गजानन हरणे यांच्यासह सकल मराठा समाजाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या राष्ट्रनिर्मितीच्या विचारांचा आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांचा प्रसार करण्याबरोबरच समाजात ऐक्य व बंधुभावाची भावना अधिक दृढ करण्याचा संदेश देण्यात आला.

---

## कल्याण-मोहने परिसरात गोळीबार; तीन आरोपी जेरबंद

जन सम्राट टाईम्स

**कल्याण | प्रतिनिधी :** कल्याणजवळील मोहने-अटाळी परिसरातील पाटील नगर येथे शुक्रवारी मध्यरात्री झालेल्या गोळीबाराच्या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. रात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास झालेल्या या प्रकारानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत तीन आरोपींना अटक केली असून प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला आहे.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिषेक उर्फ 'अभी' पवार आणि त्याचे काही साथीदार पाटील नगर परिसरातून जात असताना त्यांची मोनू फुलोरे यांच्याशी जुन्या वादाच्या कारणावरून शाब्दिक चकमक झाली. हा वाद काही क्षणांतच उग्र रूप धारण करत मोनू फुलोरे यांच्या दिशेने दोन राऊंड गोळीबार करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. फिर्यादीच्या जबाबानुसार, अभिषेक पवार याने स्वतःवर गुन्हा दाखल होऊ नये किंवा दिशाभूल करण्याच्या उद्देशाने स्वतःवरच गोळी झाडून घेतल्याचा धक्कादायक दावा करण्यात आला आहे.पोलिसांकडून तपासली जात असून त्याबाबत अद्याप अधिकृत निष्कर्ष समोर आलेला नाही. या प्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करून तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडे चौकशी सुरू आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमरनाथ वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आंधळे पुढील तपास करत आहेत.